Toppersnotes®
Unleash the topper in you

# MPSC

## गट - क

पूर्व परीक्षा

बुकलेट - 1

## इतिहास आणि राज्यशास्त्र

SIERRA INNOVATIONS

# INDEX


| S No. | Chapter Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | अठराव्या शतकातील भारत | 1 |
| 2 | युरोपियनांचे आगमन | 6 |
| 3 | पेशवे | 9 |
| 4 | इंग्रजांचा कर्नाटकमधील प्रसार | 13 |
| 5 | इंग्रजांचा बंगालमधील प्रसार | 15 |
| 6 | इंग्रजांचा म्हैसूरमधील प्रसार | 20 |
| 7 | इंग्रजांचा उत्तरमध्य भारतातील प्रसार | 22 |
| 8 | इंग्रजांचा मध्य भारतातील प्रसार | 24 |
| 9 | बेंटिंक आणि सुधारणा | 26 |
| 10 | डलहौसी आणि सुधारणा | 28 |
| 11 | इंग्रजांचे भूधोरण | 31 |
| 12 | 1857 चा उठाव | 33 |
| 13 | नवीन इंग्रज प्रशासन | 37 |
| 14 | सामाजिक सुधारणा | 41 |
| 15 | राष्ट्रीय चळवळ | 46 |
| 16 | क्रांतिकारी चळवळ | 53 |
| 17 | डावी चळवळ | 55 |
| 18 | कामगार आणि शेतकरी चळवळ | 57 |
| 19 | महत्त्वाचे कायदे व घटना | 60 |
| 20 | स्वातंत्र्य | 65 |
| 21 | संत चळवळ | 69 |
| 22 | समाजसुधारक | 73 |
| 23 | धार्मिक चळवळी | 104 |

# INDEX


| S No. | Chapter Title | Page No. |
|---|---|---|
| 24 | सामाजिक चळवळी | 109 |
| 25 | राज्यघटनेची संकल्पना | 112 |
| 26 | राज्याचा संघ व त्याचेराज्यक्षेत्र | 115 |
| 27 | नागरिकत्व | 116 |
| 28 | मूलभूत हक्क | 118 |
| 29 | मार्गदर्शक तत्त्वे | 126 |
| 30 | मूलभूत कर्तव्ये | 132 |
| 31 | केंद्रीय कार्यकारी मंडळ | 135 |
| 32 | केंद्रीय विधीमंडळ (संसद) | 145 |
| 33 | न्यायव्यवस्था | 158 |
| 34 | राज्य कार्यकारी मंडळ | 164 |
| 35 | राज्य विधीमंडळ | 169 |
| 36 | स्थानिक स्वराज्य संस्था | 174 |
| 37 | केंद्रशासित प्रदेश | 179 |
| 38 | अनुसूचित आणि आदिवासी प्रदेश | 183 |
| 39 | आणी बाणी संबंधीच्या तरतुदी | 186 |
| 40 | केंद्र–राज्य आणि आंतरराज्यीय संबंध | 190 |
| 41 | निवडणूक प्रणाली | 195 |
| 42 | घटनात्मक आणि बिगरघटनात्मक संस्था | 199 |
| 43 | घटनादुरुस्ती | 203 |

# 1 प्रकरण

# अठराव्या शतकातील भारत

## दिल्ली

### पार्श्वभूमी

- **औरंगजेबाच्या (1658–1707) मृत्यूनंतर** मुघल साम्राज्याच्या राजकीय एकतेला धक्का बसला. मुघल साम्राज्यातील औरंगजेब शेवटचा मोठा बादशाह ठरला. त्याचे उत्तराधिकारी सम्राट अशक्त, दुर्बल आणि अकार्यक्षम ठरले. त्याच्या दरबारातील सरदार सत्ता आणि पदासाठी **कटकारस्थान** करू लागले; गटबाजी वाढली.
- औरंगजेबाच्या मृत्यूनंतर चा कालावधी मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाचा कालावधी समजला जातो (1707-1857). या काळात सत्तेचे केंद्र फक्त दिल्लीपुरते मर्यादित झाले; प्रांत स्वतंत्र होत गेले. (जसे हैदराबाद 1724, बंगाल 1740). महसूलव्यवस्था ढासळल्यामुळे लष्कराचा खर्च भागवणे कठीण झाले. **परकीय आक्रमणांना (नादिरशहा, अहमदशहा अब्दाली)** तोंड देता आले नाही. **मराठ्यांचा उदय** आणि विस्तारनीतीने मुघल साम्राज्याला मोठे आव्हान दिले. इंग्रज, फ्रेंच इत्यादी परकीय व्यापाऱ्यांचा प्रभाव वाढला आणि मुघलांचे सामर्थ्य घटले.
- सांस्कृतिकदृष्ट्या मुघल दरबार संगीत, काव्य, कला यांचे केंद्र राहिले; पण राजकीय दृष्ट्या त्याचे महत्त्व कमी झाले.

### उत्तरकालीन बादशाह

- **बहादुरशहा प्रथम (1707–1712)** : औरंगजेबाचा मुलगा; साम्राज्य एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला पण यश मिळाले नाही.
- **जहाँदारशहा (1712–1713)** : अल्पकाळ राज्य. दरबारी राणी लाल कुआर (लाल कुंवर) हिच्या प्रभावाखाली. सय्यद बंधूंच्या मदतीने फर्रुखसियरने याची हत्या केली.
- **फर्रुखसियर (1713–1719)** : इंग्रजांना व्यापार सवलती देणारे फरमान दिले.
- **मुहम्मदशहा (1719–1748)** : "रंगीला" सम्राट म्हणून ओळख; कला-संगीताचा आश्रयदाता; त्याच्या काळात नादिरशाहाचे आक्रमण झाले.
- **अहमदशहा बहादूर (1748-1754)** : रोहिले, जाट व अफगाण आक्रमणांपासून संरक्षण करण्यासाठी मुघलांनी मराठ्यांसोबत 1752 मध्ये अहमदिया करार केला. **या काळात अहमदशहा अब्दालीने** दिल्लीवर वारंवार हल्ले करून मुघल सत्तेची स्थिती आणखी कमकुवत केली.
- **आलमगीर द्वितीय (1754 – 1759) :** प्रशासन आणि युद्धाचा अनुभव नाही. आयुष्याचा बराचसा काळ तुरुंगात घालवला. सर्व अधिकार त्याचा वजीर इमाद-उल-मुल्कच्या हातात होते.
- **शाहआलम द्वितीय (1760 –1806)** : मुघल साम्राज्य इंग्रजांच्या छत्रछायेखाली गेले.
- **अकबर शाह द्वितीय (1806 – 1837) :** राजा राम मोहन रॉय यांना राजा ही पदवी दिली. ईस्ट इंडिया कंपनीने स्वतःला त्यांच्या नावाने नाणी जारी करणे बंद केले.
- **बहादुरशहा द्वितीय जफर (1837–1857)** : शेवटचा सम्राट; 1857 च्या उठावात सहभागी; ब्रिटीशांनी सत्ता संपवली. बंडाच्या पराभवानंतर त्यांना रंगून, म्यानमार येथे हद्दपार करण्यात आले, जिथे नोव्हेंबर 1862 मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

### उत्तर मुघल शासनाचे स्वरूप

- **कमकुवत केंद्र** : दिल्लीतील सत्ता केवळ नामधारी; वास्तविक सत्ता प्रांतीय राज्यकर्त्यांकडे.
- **अंतर्गत स्पर्धा :** मुघल साम्राज्यातील सरदारांचे विविध गट होते त्यांनी अंतर्गत आपापसाविरोधात स्पर्धा केली. मुघल साम्राज्यात सरदारांचे इराणी तुराणी हिंदुस्तानी असे गट होते. ते आपापसात सत्ता स्पर्धा करत असत.
- **प्रांतिक स्वायत्तता** : बंगाल, अवध, हैदराबाद, म्हैसूर इ. प्रांतांमध्ये स्वायत्त सत्ता.
- **अव्यवस्थित लष्कर** : शिस्त अभावी परकीय आक्रमणांना तोंड देता आले नाही.
- **आर्थिक अवनती** : महसूल कमी, भ्रष्टाचार वाढला, व्यापारावर परकीयांचा ताबा.
- **सांस्कृतिक केंद्र** : दरबार कला, संगीत, कविता यांचे केंद्र राहिले; परंतु राजकीय महत्त्व गमावले.

### कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1707 | औरंगजेबाचा मृत्यू – ऱ्हासाची सुरुवात |
| 1713 | फर्रुखसियरचे इंग्रजांना विशेषाधिकार |
| 1739 | नादिरशाहाचा हल्ला – दिल्लीची लूट |
| 1748–67 | अहमदशहा अब्दालीची आक्रमणे |
| 1857 | स्वातंत्र्यसंग्रामानंतर मुघल साम्राज्याचा अंत |

# उत्तर भारत

## पार्श्वभूमी

- औरंगजेबाच्या मृत्यूनंतर उत्तर भारतात केंद्रीकृत सत्ता दुर्बल झाली.
- दिल्लीवरील मुघल सत्तेचा प्रभाव कमी झाल्याने प्रांतीय राजवंश व समुदाय स्वतंत्र होऊ लागले.
- या प्रक्रियेत **राजपूत, जाट आणि शिख** यांनी स्वतंत्र ओळख निर्माण करून आपले राजकीय बळ वाढवले.

## राजपूत

- मुगलांच्या उत्तरकाळात राजपूतांनी आपली परंपरागत सत्ता टिकवून ठेवली.
- राजपूत संस्थानिक दिल्ली दरबारात उपस्थित राहत असले तरी ते **स्वतंत्र राज्यकर्ते** म्हणून वागत.
- औरंगजेबाच्या मृत्यू नंतर **जयसिंग व अजित सिंग** या राजपूत सरदारांनी त्यांच्या अंबर व जोधपुर या राजधान्या मुघलांकडून परत मिळवल्या (1708-1710). जयपूर (कछवाहा), जोधपूर (राठोड), उदयपूर (सिसोदिया) ही राजपूत राज्ये स्थानिक स्तरावर प्रभावी होती.
- काही राजपूत सरदार मुघल सरदारांशी संधान बांधत. कधी कधी साम्राज्याशी त्यांची निष्ठा ढळलेली दिसते.

## जाट

- मथुरा व आग्र्याच्या परिसरात जाटांनी मुघलांविरुद्ध उठाव केला. सुरुवातीला हा उठाव कर-वसुली व अत्याचारांविरुद्ध होता; नंतर त्याने राजकीय स्वरूप घेतले. जाट शेतकरीवर्ग युद्धकौशल्यात पारंगत होता.
- **सुरजमल** (1707–1763) हा जाटांचा सर्वात सामर्थ्यवान शासक ठरला; त्याला "**जाटांचा प्लुटार्क**" म्हटले जाते.
- भरतपूर हे जाटांच्या सत्तेचे केंद्र बनले.

## शिख

- शिखांचे **नववे गुरू गुरु तेग बहादूर** यांनी औरंगजेबाच्या असहिष्णू धार्मिक धोरणाविरुद्ध तीव्र नापसंती दर्शवली. औरंगजेबाने त्यांना कैद करून 1675 मध्ये त्यांचा शिरच्छेद केला.
- त्यांच्यानंतर गुरुगोविंदसिंग हे शिखांचे गुरू झाले. गुरुगोविंदसिंग यांनी **खालसा पंथ** (1699) स्थापन करून शिखांना युद्धनिष्ठा दिली. गुरु गोविंदसिंह व बंदा बैरागी यांच्या नेतृत्वाखाली शिखांनी मुघलांविरुद्ध कठोर संघर्ष केला.
- 18व्या शतकात शिखांनी अनेक **मिसल** (लष्करी संघटना) तयार केल्या. नंतर या मिसलांमधून रणजितसिंहाने शीख साम्राज्य उभारले (19वे शतकाच्या सुरुवातीला).

## योगदान व परिणाम

- **राजपूत, जाट व शिख** या तिन्ही **घटकांनी मुघल सत्तेचे अधःपतन वेगवान** केले.
- दिल्लीच्या बाहेर प्रादेशिक राज्यांचा प्रभाव प्रस्थापित झाला.
- समाजातील शेतकरी, योद्धे व व्यापारी घटकांनी स्वतंत्र **राजकीय ओळख** मिळवली.
- पुढे या राज्यांनी इंग्रजांशी वेगवेगळ्या प्रकारे संबंध ठेवले व 18व्या शतकातील भारतीय राजकारणात मोठी भूमिका बजावली.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1699 | गुरु गोविंदसिंह यांनी खालसा पंथाची स्थापना केली. |
| 1707 | औरंगजेबाचा मृत्यू – शिख-जाट उठाव तीव्र. |
| 1710 | बंदा बैरागीचे नेतृत्व – शिखांचा संघर्ष. |
| 1733 | जाटांचे भरतपूर राज्य प्रबळ झाले. |
| 1763 | सुरजमलचा मृत्यू – जाटांचे राज्य स्थिरावले. |

# पूर्व आणि मध्य भारत

## पार्श्वभूमी

- मुघल सत्तेच्या अधोगतीनंतर पूर्व व मध्य भारतात **प्रांतीय राज्यकर्ते (अवध, रोहिलखंड, बंगाल)** प्रभावी झाले.
- केंद्र सरकार (दिल्ली) दुर्बल झाल्याने या प्रदेशातील सरदार व सुभेदार स्वतंत्रपणे सत्ता चालवू लागले.
- व्यापार, करसंकलन, लष्करी बळ व प्रादेशिक संसाधनांवर नियंत्रण ठेवून या प्रांतीय राज्यकर्त्यांनी **स्वायत्त सत्ताकेंद्रे** उभी केली.

## अवध

- अवध हा प्रदेश गंगा-यमुना दोआब व मध्य गंगेच्या मैदानात होता.
- 18 व्या शतकात मुघल साम्राज्याच्या विघटनानंतर अवध एक स्वायत्त राज्य म्हणून उदयास आले. नवाब **सादत अली खान** (1722–1739) हा अवधचा सर्वात प्रभावी शासक ठरला.

ToppersNotes
Unleash the topper in you

- सुरवातीला फैजाबाद ही अवधची राजधानी होती. नंतर ती लखनौमध्ये हलवण्यात आली. या काळात अवध कला, साहित्य, आणि वास्तुकला यांचे एक महत्त्वाचे केंद्र बनले. अवध दरबार ऐश्वर्यसंपन्न व सांस्कृतिकदृष्ट्या वैभवशाली होता.
- पुढे अवध नवाब व इंग्रजांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले.

## रोहिलखंड

- रोहिले (अफगाण सरदार) यांनी रोहिलखंड (आजचा उत्तर प्रदेशातील बरेली परिसर) आपले राज्यकेंद्र बनवले.
- ते शूर योद्धे होते व त्यांनी मुघलांना फारसे मानले नाही. पुढे रोहिलखंड मराठे व अवध नवाबांच्या संघर्षाचे केंद्र बनले.
- मुघल साम्राज्याच्या ऱ्हासाकरिता **नजीब खान रोहिला** हा रोहिल्यांचा सरदार प्रामुख्याने कारणीभूत होता. 1761 मध्ये मराठ्यांचे अहमदशाह अब्दाली सोबत झालेल्या युद्धामध्ये देखील मराठ्यांच्या पराभवात नजीब खान रोहिल्याचा मोठा वाटा होता

## बंगाल

- बंगाल हा आर्थिकदृष्ट्या सर्वात समृद्ध प्रांत मानला जायचा. बंगालमध्ये **रेशीम, मुसलिन, साखर, तांदूळ** यांचा मोठा व्यापार होता. या व्यापारामुळे युरोपियन कंपनींचा प्रभाव झपाट्याने वाढला.
- **मुर्शिद कुली खान** (1717) हा बंगालचा पहिला स्वतंत्र नवाब. **अलिवर्दी खान** (1740–1756) हा बंगालचा प्रभावी नवाब ठरला. पुढे **सिराजुद्दौला** व इंग्रजांतील संघर्षामुळे (प्लासीची लढाई – 1757) बंगालवर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले.

## योगदान व परिणाम

- अवध, रोहिलखंड आणि बंगाल या प्रांतांनी दिल्लीपासून स्वतंत्र ओळख प्रस्थापित केली.
- प्रांतीय सरदारांनी सांस्कृतिक, आर्थिक व लष्करी क्षेत्रात मोठा प्रभाव निर्माण केला.
- बंगालच्या संपत्तीमुळे युरोपियन सत्ता (विशेषतः इंग्रज) येथे स्थिरावली.
- रोहिलखंडातील संघर्षामुळे मराठे व इंग्रजांना मुघल साम्राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1717 | मुर्शिद कुली खान – बंगालचा स्वतंत्र नवाब |
| 1722 | सादत अली खान – अवधमध्ये सत्ता स्थापन |
| 1740 | अलिवर्दी खान बंगालचा नवाब |
| 1757 | प्लासीची लढाई – इंग्रज विजय, बंगालवर वर्चस्व |
| 1774 | रोहिलखंड युद्ध – रुहेल्यांचा पराभव |

# दक्खन

## पार्श्वभूमी

- दक्खन म्हणजे आजचा **महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश** यांचा भाग.
- औरंगजेबाच्या मृत्यूनंतर **दक्खन** प्रदेशातील मुघल सत्ता कोलमडली. **मराठे** आणि **निजाम** यांनी दक्खनमध्ये स्वतंत्र सत्ता निर्माण केली.
- या दोन्ही सत्तांनी (मराठे व निजाम) एकमेकांविरुद्ध आणि इंग्रजांविरुद्ध स्वतंत्र राजकारण केले.

## मराठे

- **शिवाजी महाराजां** च्या पश्चात मराठा साम्राज्याचा विस्तार **पेशव्यांच्या** नेतृत्वाखाली झाला.
- मराठ्यांचा उद्देश – **हिंदवी स्वराज्याचा** विस्तार.
- **पेशवा पहिला बाजीराव** यांनी विखुरलेल्या मराठ्यांना एकत्रित करून एकसंध मराठ्यांचा संघ तयार केला. **पुणे** हे राजधानीचे व राजकीय केंद्र बनले.
- मराठ्यांनी उत्तरेत **दिल्ली** पर्यंत स्वारी केली व मुघल सम्राटाला संरक्षण दिले. मराठ्यांनी **चौथाई** व **सरदेशमुखी** हक्काने मुघल प्रांतांतून महसूल वसूल केला.
- मराठ्यांची प्रमुख सत्ताकेंद्रे – **पुणे (पेशवे), सातारा (छत्रपती), ग्वाल्हेर (शिंदे), इंदूर (होळकर), बडोदा (गायकवाड), नागपूर (भोसले)**.

## निजाम

- **निजाम-उल-मुल्क आसफ जाह** हा औरंगजेबाच्या काळात दक्खनचा सुभेदार होता. 1724 मध्ये त्याने मुघल सत्तेला सोडून **हैदराबाद** येथे स्वतंत्र आसफ जाही राजघराण्याची स्थापना केली. हैदराबाद हे दक्खनमधील महत्त्वाचे मुस्लिम राज्य बनले.
- निजाम उल मुल्क चा मृत्यू 1748 मध्ये झाला. त्यानंतरही निजामाची सत्ता दीर्घकाळ टिकली (1724–1948 पर्यंत).

Toppers Notes Unleash the topper in you

## मराठे–निजाम संबंध

- मराठे व निजाम यांच्यात अनेक वेळा युद्धे झाली. मराठ्यांनी अनेकदा निजामाला पराभूत करून करार केले.
- **मुंगी-शेवगावचा तह** हा बाजीराव पहिला (मराठा) आणि हैदराबादचा निजाम उल मुल्क यांच्यात 6 मार्च 1728 रोजी शेवगाव येथे झाला होता. या तहानुसार, निजामाने मराठ्यांना दक्षिणेकडील सहा सुभ्यांकडून 'चौथ' हा कर गोळा करण्याचा अधिकार दिला आणि मराठा साम्राज्याचा सम्राट म्हणून शाहू प्रथम यांना मान्यता दिली.
- **उदगीरची लढाई** ही मराठा साम्राज्य आणि हैदराबादच्या निजामामध्ये इ.स. 1760 मध्ये झाली, ज्यात सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचा निर्णायक विजय झाला आणि उदगीरचा तह झाला. यामुळे मराठ्यांची दख्खनमधील सत्ता अधिक मजबूत झाली.
- निजाम व इंग्रजांमध्येही अनेक लढाया आणि तह झाले.

## योगदान व परिणाम

- मराठ्यांनी दक्खनमध्ये राजकीय स्थैर्य निर्माण केले आणि **स्वराज्याचा विस्तार केला.**
- निजामाने हैदराबादमध्ये **कला, वास्तू व उर्दू साहित्याला** प्रोत्साहन दिले.
- मराठे व निजाम यांच्या संघर्षामुळे **इंग्रजांना हस्तक्षेपाची संधी** मिळाली.
- दक्खन हा पुढील काळात ब्रिटिश भारताच्या राजकारणातील प्रमुख केंद्र ठरला.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1724 | **निजाम-उल-मुल्क**ने हैदराबादमध्ये स्वतंत्र सत्ता स्थापली |
| 1728 | **शेवगावचा तह** |
| 1760 | **उदगीरची लढाई** – मराठ्यांचा निजामवर विजय |

# परकीय आक्रमणे

## पार्श्वभूमी

- औरंगजेबाच्या मृत्यूनंतर **मुघल साम्राज्य** दुर्बल झाले होते. या दुर्बलतेचा फायदा घेऊन **पर्शिया** व **अफगाणिस्तान** येथील शासकांनी देखील भारतावर आक्रमणे केली.
- विशेषतः **नादिरशहा** (पर्शिया) व **अहमदशहा अब्दाली** (अफगाणिस्तान) यांच्या आक्रमणांनी मुघलांची सत्ता हादरली. या आक्रमणांमुळे भारताची **आर्थिक लूट**, **राजकीय ऱ्हास** व **ब्रिटिश हस्तक्षेपासाठी संधी** निर्माण झाली.

## नादिरशहाचे आक्रमण (1739)

- **नादिरशहा** हा पर्शियाचा शासक होता. त्याने **कंदाहार, काबूल व पेशावर** जिंकून भारतावर स्वारी केली.
- **कर्नालच्या लढाईत (1739)** मुघल सम्राट **मुहम्मदशहा शाह** (रंगीला) याचा पराभव झाला.
- नादिरशहाने **दिल्ली** ताब्यात घेऊन अमर्याद लूट केली. प्रसिद्ध **मयूरसिंहासन** व **कोहिनूर हिरा** तो पर्शियाला घेऊन गेला. या आक्रमणामुळे मुघल साम्राज्याची **प्रतिष्ठा धुळीस मिळाली**.

## अहमदशहा अब्दालीची आक्रमणे (1748–1767)

- **अहमदशहा अब्दाली** हा अफगाणिस्तानचा शासक होता. त्याने भारतावर **8 वेळा आक्रमण** केले.
- पहिल्या आक्रमणात (1748) तो पराभूत झाला. पुढील आक्रमणांतून त्याने **दिल्ली व पंजाब** लुटले.
- **पानिपतची तिसरी लढाई (1761)** – अब्दाली व **मराठे** यांच्यात झाली. या युद्धात मराठ्यांचा मोठा पराभव झाला, पण अब्दालीला भारतात सत्ता प्रस्थापित करता आली नाही.
- अब्दालीच्या मृत्यूनंतर (1773) अफगाणांचा प्रभाव संपुष्टात आला.

## परिणाम

- नादिरशहा व अब्दालीच्या आक्रमणांनी भारताची **अर्थव्यवस्था उद्ध्वस्त** झाली.
- दिल्लीतील मुघल सत्तेची **प्रतिष्ठा पूर्णपणे कोसळली**. उत्तर भारतात **राजकीय अस्थिरता** वाढली.
- अब्दालीच्या आक्रमणानंतर मराठ्यांचे साम्राज्य कायमचे हादरले.
- इंग्रजांना या गोंधळाचा फायदा घेऊन आपली सत्ता विस्तारता आली.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1739 | **कर्नालची लढाई** – नादिरशहाने मुघलांचा पराभव, दिल्ली लुटली, मयूरसिंहासन व कोहिनूर हिरा नेला |
| 1748 | अहमदशहा अब्दालीचे पहिले आक्रमण (पराभूत) |
| 1757 | अब्दालीने दिल्ली व पंजाब लुटले |
| 1761 | **पानिपतची तिसरी लढाई** – अब्दालीचा विजय, मराठ्यांचा पराभव |

# मुघल साम्राज्याचा शेवट

## पार्श्वभूमी

- **औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (1707)** मुघल साम्राज्याचे केंद्रीकृत सामर्थ्य संपले.
- **दुर्बल उत्तराधिकारी सम्राट**, सरदारांतील स्वार्थी गटबाजी व प्रांतिक बंडाळ्या यामुळे साम्राज्याची सत्ता केवळ दिल्लीपुरती उरली.
- नादिरशहा व अब्दालीसारख्या **परकीय आक्रमणांनी** मुघलांचे सामर्थ्य आणखी खिळखिळे केले.
- साम्राज्याच्या राजकीय व लष्करी क्षीणतेमुळे **मराठे, शीख, जाट, नबाब** यांसारख्या प्रांतिक शक्ती पुढे आल्या.

## पतनाची कारणे

- **औरंगजेबाची धार्मिक असहिष्णुता** – जिझिया, मंदिरे तोडणे यामुळे हिंदू प्रजेचा विरोध.
- **दुर्बल उत्तराधिकारी** – बहुतेक सम्राट अशक्त, ऐषआरामी व सरदारांच्या हातातील बाहुले.
- **गटबाजी व दरबारी कटकारस्थान** – सरदार सत्तेसाठी सतत लढत होते.
- **लष्करी दुर्बलता** – जुनी लढाऊ पद्धत, नवे युरोपीय शस्त्रास्त्रांचा अभाव.
- **आर्थिक ऱ्हास** – युद्धे, फौजेवर होणारा खर्च, भ्रष्ट प्रशासन.
- **प्रांतिक राज्यांचा उदय** – अवध, बंगाल, हैदराबाद, मराठे, शीख यांनी स्वतंत्र सत्ता निर्माण केल्या.
- **परकीय आक्रमणे** – नादिरशहा व अब्दालीने मुघलांची प्रतिष्ठा व आर्थिक कणा मोडला.
- **ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा उदय** – व्यापाराच्या नावाखाली हळूहळू राजकीय सत्ता मिळवली.
- **ब्रिटिश शासनाचे विस्तारवादी धोरण** - तैनाती फौजसारख्या धोरणामुळे ब्रिटिश शासनाने अनेक स्थानिक सत्ता आपल्या वर्चस्वाखाली आणली

## परिणाम

- 18व्या शतकात मुघल साम्राज्य **फक्त नावापुरते** राहिले. दिल्लीपलीकडे त्यांची सत्ता टिकली नाही.
- **मराठे** काही काळ 'हिंदुस्थानचे राखीवदार' बनले.
- अखेरीस **1857 च्या उठावानंतर** ब्रिटिशांनी मुघल सत्तेचा शेवट केला. **बहादुर शाह दुसरा** हा शेवटचा मुघल सम्राट ठरला.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1707 | औरंगजेबाचा मृत्यू – साम्राज्याचा ऱ्हास सुरू |
| 1739 | नादिरशहाचे आक्रमण व दिल्लीची लूट |
| 1761 | पानिपतची तिसरी लढाई – मराठ्यांचा पराभव |
| 1803 | इंग्रजांनी दिल्ली ताब्यात घेतली |
| 1857 | उठाव – मुघलांचा वापर प्रतीक म्हणून |
| 1858 | मुघल सत्तेचा अंत – बहादुर शाह दुसरा रंगून येथे निर्वासित |

Unleash the topper in you

# 2 प्रकरण युरोपियनांचे आगमन

## पूर्व स्थिती

➢ 18व्या शतकातील भारताची सामाजिक व आर्थिक स्थिती

### सामाजिक स्थिती

➢ **जातिव्यवस्था कठोर** – चातुर्वण्य (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) आधारित व्यवस्था, अस्पृश्यतेमुळे अनेक जातींचे दमन.

➢ **धर्माधिष्ठित जीवनशैली** – अंधश्रद्धा, कर्मकांड, ज्योतिष, मंत्रतंत्र यांचा प्रभाव.

➢ **स्त्रियांची स्थिती खालावलेली** – बालविवाह, सतीप्रथा. विधवा पुनर्विवाहावर बंदी.

➢ **शिक्षण मर्यादित** – प्रामुख्याने उच्च वर्णीयांपुरते; पारंपरिक पद्धतीने गुरुकुलांत धार्मिक विषयांचे शिक्षण.

➢ **प्रांतिक विभागणी** – प्रांतिक सरदार व संस्थानिक यांच्यात स्पर्धा, सामाजिक ऐक्याचा अभाव.

### आर्थिक स्थिती

➢ **कृषीप्रधान अर्थव्यवस्था** – बहुतांश जनता शेतीवर अवलंबून. करप्रणाली जड व अन्यायकारक.

➢ **हस्तकला आणि उद्योग** – कापूस, रेशीम, धातू, जहाजबांधणी यांचे परंपरागत उद्योग.

➢ **व्यापार** – भारतातील वस्त्र, मसाले, धातू यांना युरोप व आशियामध्ये मोठी मागणी.

➢ **चलनव्यवस्था** – चांदी व सोन्याची नाणी; परंतु प्रांतिक सत्तांमुळे मुघल चलनाचे एकसंधपण हरवले.

➢ **करभार** – शेतकऱ्यांवर मोठा महसूल भार; शोषणामुळे ग्रामीण जनतेचे हाल.

➢ **व्यापारी वर्ग** – मारवाडी, गुजराती, पारशी व्यापारी सक्रिय; समुद्री व्यापारात अरब, पोर्तुगीज यांचा हस्तक्षेप सुरू.

➢ **वारंवार पडणारे दुष्काळ** - वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे आर्थिक स्थैर्य विस्कटले.

### वैशिष्ट्यपूर्ण बाबी

➢ भारत संपन्न (**सोन्याचा पक्षी**) म्हणून ओळखला जात असे.

➢ संपत्ती, मसाले, वस्त्र, मौल्यवान धातू यामुळे **युरोपियनांना भारताचे आकर्षण** वाटले.

➢ सामाजिक दृष्ट्या भारतात स्थैर्य नसून मोठी **जातीय व प्रांतिक फाटाफूट** होती. याचा फायदा परकीयांनी घेतला.

## पोर्तुगीज

### पार्श्वभूमी

➢ 1292 - इटालियन व्यापारी, शोधक आणि लेखक मार्को पोलो भारताच्या कोरोमंडल किनाऱ्यावर उतरला. मार्को पोलोच्या प्रवासामुळे युरोपियन लोकांना भारताचे आकर्षण वाटू लागले. एक शतकानंतर युरोपीयन लोकांचा संशोधन प्रवास सुरू झाला.

➢ युरेशियातील **ओटोमन साम्राज्याच्या वर्चस्वामुळे** भारताकडे जाणाऱ्या रस्तेमार्गावर बंधने आली. 1453 मध्ये ओटोमन साम्राज्याने **कॉन्स्टँटिनोपल** (इस्तंबूल) जिंकले. भारताकडे जाणारा रस्ता मार्ग कॉन्स्टँटिनोपल मधून जात होता. तो बंद झाला.

➢ भारतातील मसाले, रेशीम, मौल्यवान धातू यांची प्रचंड मागणी युरोपात होती. यामुळे युरोपियनांनी **समुद्री मार्ग शोधण्याचे प्रयत्न** सुरू केले.

### वास्को द गामा

➢ **20 मे 1498 ला वास्को द गामा** हा पोर्तुगीज खलाशी **कालीकत (केरळ)** येथे पोहोचला. त्याने भारत–युरोप यामधील **समुद्री व्यापाराचा नवा मार्ग** उघडला. त्याने आफ्रिका खंडाला वळसा घालून भारतामध्ये येण्याचा मार्ग शोधला. वास्को द गामाला भारतात आणणारा मार्ग **'केप ऑफ गुड होप'** मार्ग म्हणून ओळखला जातो.

➢ या घटनेनंतर भारतात युरोपियनांच्या **व्यापार स्पर्धेला प्रारंभ** झाला. या घटनेने भारतातील **सामाजिक, आर्थिक व राजकीय घडामोडींना नवे वळण** मिळाले. या मार्गामुळे अरब व्यापाऱ्यांची व्यापारातील एकाधिकारशाही संपायला सुरवात झाली.

- वास्को द गामाचे कालीकतच्या **झामोरीन** राजाने स्वागत केले. वास्को द गामाने युरोपात परतताना मोठ्या प्रमाणावर **मसाले व मौल्यवान वस्तू** नेल्या. त्यामुळे पोर्तुगीजांची भारतातील **सत्तेची व व्यापाराची पायाभरणी** झाली. पुढील काही वर्षांत पोर्तुगीजांनी **गोवा, दमण, दीव** अशा महत्त्वाच्या ठिकाणी वखारी स्थापन केल्या.
- भारताबरोबर व्यापार करण्यासाठी पोर्तुगीजांनी **पोर्तुगीज स्टेट ऑफ इंडिया** स्थापन केली. **डी फ्रान्सिस्को डी आल्मेडा** पोर्तुगीज स्टेट ऑफ इंडियाचा पहिला राज्यपाल - गव्हर्नर ठरला. पोर्तुगीजांनी किल्वा जिंकले, अंजेदिवा, कोचीन, कॅन्नोर येथे किल्ले उभारले. 1510 मध्ये विजापूरच्या आदिलशहाकडून गोवा जिंकले. 1556 मध्ये भारतातील पहिली प्रिंटिंग प्रेस गोवा येथे सुरू केली

## पोर्तुगीजांचा प्रभाव

- **व्यापार केंद्रे** – गोवा, दमण, दीव, चौल, वसई, कोचिन येथे त्यांनी वखारी स्थापन केल्या. गोवा हे पोर्तुगीजांचे **मुख्य वसाहती केंद्र** बनले. सुरुवातीच्या काळात कोचीन हे पोर्तुगीजांचे मुख्यालय होते पंधराशे दहा मध्ये गोवा हस्तगत केल्या नंतर.
- **व्यापार** – मसाले, मिरी, आलं, कापूस, नीळ, रेशीम यांचा व्यापार भरभराटीस आला.
- **सैन्य व आरमार** – पोर्तुगीजांकडे आधुनिक तोफखाना व बलाढ्य आरमार होते.

## धार्मिक बाजू

- पोर्तुगीज ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यास कटिबद्ध होते. त्यांनी **जेसुइट पाद्री** पाठवून धर्मप्रसार केला.
- स्थानिकांवर धर्मांतरासाठी दबाव टाकला.

## पोर्तुगीजांचे पतन

- इंग्रज, फ्रेंच, डच यांच्या आगमनानंतर पोर्तुगीजांचे वर्चस्व कमी होऊ लागले.
- **1661 मध्ये वसईचा ताबा इंग्रजांकडे** गेला.
- 17व्या शतकाच्या अखेरीस भारतातील त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला.
- गोवा, दमण, दीव हेच त्यांचे प्रमुख वसाहती प्रदेश उरले.
- भारतीय सशस्त्र दलाने ऑपरेशन विजय राबवून 17-19 डिसेंबर 1961 ला दीव, दमण आणि गोवा प्रदेश पोर्तुगीज राजवटीतून मुक्त केले.

## कालरेषा

| **वर्ष** | **घटना** |
|---|---|
| 1498 | वास्को द गामा कालीकत येथे आगमन |
| 1505 | डी फ्रान्सिस्को डी आल्मेडा – पोर्तुगीजांचा पहिला राज्यपाल |
| 1509 | अल्फान्सो द अल्बुकर्क – गोव्याचा विजय. पोर्तुगीज सत्तेचा भारतातील वास्तविक संस्थापक. |
| 1530 | गोवा राजधानी घोषित |
| 1661 | वसईचा ताबा इंग्रजांकडे |
| 17व्या शतकानंतर | पोर्तुगीजांचा ऱ्हास. तरीही 1961 पर्यंत पोर्तुगीजांचे गोवा प्रदेशात मर्यादित वर्चस्व. |

# इतर युरोपियन

## पार्श्वभूमी

- वास्को द गामाच्या 1498 च्या आगमनानंतर इतर युरोपियन राष्ट्रांनीही भारतात व्यापारासाठी प्रयत्न सुरू केले.
- मसाले, कापूस, रेशीम, नीळ या वस्तूंची **युरोपात मोठी मागणी** होती. त्यामुळे **डच, इंग्रज, फ्रेंच व डेनीश** यांनी भारतात व्यापार केंद्रे स्थापन केली.

## डच (नेदरलँड)

- 1595-96 मध्ये डचांचे पुलिकत या ठिकाणी भारतात आगमन झाले. 1602 मध्ये **डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना** झाली.
- **कंपनीच्या व्यापाऱ्यांनी 1605 मध्ये मसुलीपट्टण, 1610 मध्ये पुलिकत, 1616 मध्ये सुरत, 1627 मध्ये बंगाल वखारी स्थापन केल्या, तर 1653 मध्ये चिनसुरा येथे वसाहत स्थापन केली.**
- सुरुवातीला मसाल्यांच्या व्यापारावर त्यांचे वर्चस्व होते. परंतु 17व्या शतकाच्या अखेरीस इंग्रजांशी झालेल्या स्पर्धेत ते पराभूत झाले. अँग्लो-डच तहानुसार डचांनी उर्वरित सर्व वसाहती व व्यापार ब्रिटिशांना सोपवला. शेवटी डचांचा प्रभाव फक्त **इंडोनेशिया** पर्यंत मर्यादित राहिला.
- 1825 मध्ये डच भारतातून गेले.

## इंग्रज

- **1600 – ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना**. इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिने 31 डिसेंबर 1600 रोजी कंपनीला भारतासहित पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा अधिकार दिला.

- मुघल सम्राट जहांगीरने 1613 मध्ये कंपनीला **सुरत** येथे वखार सुरू करण्याची परवानगी दिली. पुढे **बॉम्बे, मद्रास, कलकत्ता** येथे मोठी व्यापार केंद्रे सुरू झाली. हळूहळू इंग्रजांनी पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांना पराभूत करून भारतावर राज्य स्थापले.
- **1858** मध्ये कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात आली आणि भारताचे प्रशासकीय नियंत्रण **ब्रिटिश राजवटीकडे** सोपवण्यात आले.
- **15 ऑगस्ट 1947** ला भारत ब्रिटिश राजवटीतून स्वतंत्र झाला.

## डॅनिश (डेन्मार्क)

- **1616 – डॅनिश ईस्ट इंडिया कंपनी** 1616 मध्ये डॅनिश राजा ख्रिश्चन IV च्या अंतर्गत स्थापन करण्यात आली. तिचा उद्देश भारताबरोबरच्या व्यापारावर लक्ष केंद्रित करणे होता. डॅनिश ईस्ट इंडिया कंपनीला 1620 मध्ये **ट्रांकेबार** येथे वसाहत व व्यापार करण्याची परवानगी मिळाली. सेरामपूर येथे देखील त्यांची वखार होती.
- 1845 मध्ये डॅनिश भारतातून गेले. डेन्मार्कने 1845 पर्यंत भारताच्या मुख्य भूभागातील सर्व वसाहती ब्रिटिशांना विकल्या.

## फ्रेंच

- **1664** – राजा चौदाव्या लुईच्या अध्यादेशाने कोल्बर्टने 1664 मध्ये **फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी** स्थापन केली. 1666 मध्ये फ्रेंचांनी औरंगजेबकडून सुरत बंदरावर व्यापार करण्याचा शाही हुकूम मिळवला.
- कंपनीने 1668 मध्ये फ्रान्सिस कॅरॉनच्या नेतृत्वाखाली सुरत येथे पहिली वखार स्थापन केली. 1673 मध्ये चंदरनागोर, 1674 मध्ये **पाँडिचेरी** येथे वखारी स्थापन केल्या.
- 17व्या-18व्या शतकात इंग्रज–फ्रेंच स्पर्धा वाढली. अखेरच्या **कर्नाटक युद्धांमध्ये इंग्रज विजयी** झाले. त्यामुळे भारतात फ्रेंचांचा प्रभाव फक्त काही ठिकाणी उरला.
- भारतासोबतची व्यापारावरील फ्रेंच मक्तेदारी 1769 मध्ये संपली आणि इंग्रजांनी व्यापारात मजल मारली. पाँडिचेरी आणि चंदरनागोरसह अनेक भारतीय व्यापारी बंदरे 1954 पर्यंत फ्रेंच नियंत्रणाखाली राहिली.

## कालरेषा

| **वर्ष** | **घटना** |
|---|---|
| 1600 | इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना |
| 1602 | डच ईस्ट इंडिया कंपनी |
| 1616 | डॅनिश ईस्ट इंडिया कंपनी |
| 1664 | फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी |

Toppersnotes
Unleash the topper in you

# 3 प्रकरण

# पेशवे

## पेशव्यांची वंशावळ

### पार्श्वभूमी

- **छत्रपती शिवाजी महाराजांनंतर** मराठा साम्राज्याचे केंद्रीकरण ढासळले. छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र छत्रपती शाहू महाराज यांना साम्राज्य टिकवण्यासाठी सक्षम **प्रधानाची आवश्यकता** होती. या पार्श्वभूमीवर 1713 मध्ये शाहूंनी **बाळाजी विश्वनाथ** यांना पेशवे नेमले.
- पुढील शंभर वर्षांत पेशवे हे **मराठा साम्राज्याचे वास्तविक सत्ताधीश** बनले. पेशवेकाळात पुणे हे **राजधानी व राजकीय केंद्र** झाले.

### पेशवे

1. **बाळाजी विश्वनाथ (1713–1720)**
   - ✓ शाहूंचे विश्वासू मंत्री.
   - ✓ दिल्ली दरबाराशी तह करून मराठ्यांचा **छत्रपती म्हणून मान्यता** मिळवली.
   - ✓ मराठ्यांचा राजकीय पाया घट्ट केला.
2. **बाजीराव प्रथम (1720–1740)**
   - ✓ पराक्रमी योद्धा आणि युद्धनीतीज्ञ, विजयी सेनानी.
   - ✓ 'उत्तर भारत मोहिमा' राबवून मराठा साम्राज्याचा विस्तार.
3. **बाळाजी बाजीराव (नानासाहेब) (1740–1761)**
   - ✓ साम्राज्याचा विस्तार व संघटन वाढवले.
   - ✓ पण **पानिपतच्या तिसऱ्या युद्धात (1761)** मोठा पराभव पत्करला.
4. **माधवराव प्रथम (1761–1772)**
   - ✓ पराभवानंतर साम्राज्य उभे करण्याचे प्रयत्न.
   - ✓ प्रशासन व लष्कर पुन्हा संघटित केले.
5. **नारायणराव (1772–1773)**
   - ✓ अल्पवयीन पेशवे; कारकीर्द अल्पकाळ टिकली.
   - ✓ **हत्येमुळे राज्यसत्ता अस्थिर** झाली.
6. **राघोबा (राघोबादादा) (1773–1774)**
   - ✓ ब्रिटिशांच्या मदतीने पेशवाई मिळवण्याचा प्रयत्न; परंतु अपयश.
7. **माधवराव द्वितीय (1774–1796) किंवा सवाई माधवराव**
   - ✓ बारभाई मंडळाच्या सहाय्याने पेशवे पद मिळाले.
   - ✓ इंग्रजांशी तह व संघर्षाचा काळ.
   - ✓ मराठा साम्राज्य कमकुवत होत गेले.
8. **बाजीराव द्वितीय (1796–1818)**
   - ✓ शेवटचे पेशवे.
   - ✓ इंग्रजांविरुद्ध युद्धे; अखेरीस **1818 मध्ये पराभव** व पेशवाईचा अंत.

### योगदान

- पुण्याला **राजकीय व सांस्कृतिक राजधानी** बनवले.
- मराठा राज्यव्यवस्था व प्रशासन अधिक संगठित केले. मराठा साम्राज्याचा अखिल भारतीय **प्रदेशीय विस्तार** व संघटन केले.
- मराठ्यांची सत्ता अटक ते कटक पर्यन्त स्थापित झाली. दिल्ली मुघल शाहीवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले.

## सुरवातीचे पेशवे

### पार्श्वभूमी

- छत्रपती शाहू महाराजांना सत्ता टिकवण्यासाठी **सक्षम प्रधानाची आवश्यकता** होती. पेशवेपदामुळे मराठा साम्राज्याचे **प्रशासन अधिक केंद्रीकृत** झाले.
- सुरवातीचे पेशवे – **बाळाजी विश्वनाथ, बाजीराव प्रथम, बाळाजी बाजीराव (नानासाहेब)** – यांनी साम्राज्याचा पाया, विस्तार आणि संघटन या तीन टप्प्यांत मोठा वाटा उचलला.

### कार्यक्षेत्र व चळवळी

1. **बाळाजी विश्वनाथ (1713–1720)**
   - ✓ **कोकणातील चितपावन ब्राह्मण कुटुंबात** जन्मले. त्यांचा जन्म इ.स. 1662 च्या सुमारास भोरजवळील श्रीवर्धन (जि. रायगड, महाराष्ट्र) येथे झाला. सुरुवातीच्या काळात त्यांनी पुण्याजवळील सिद्दी व मुघलांविरुद्ध लढणाऱ्या मराठा सरदारांच्या फौजेत काम केले. त्यानंतर दत्ताजी पंत, दळवी आदी सरदारांच्या सेवेतून पुढे येत ते शाहू महाराजांच्या विश्वासास पात्र झाले.
   - ✓ दिल्लीतील सत्ताधाऱ्यांशी चतुराईने वागून मराठ्यांची ताकद उत्तर भारतापर्यंत पोहोचवली.

- ✓ **1719 मध्ये दिल्ली दरबाराशी तह** करून मराठ्यांना छत्रपती म्हणून मान्यता मिळवली. **मराठ्यांना 6 पैकी 4 परगणे व चतुर्थांश महसूल** (चारत्र) मिळवून दिला.
- ✓ मराठा साम्राज्याचे तुकडे होऊ नयेत यासाठी संतुलित व समन्वयात्मक भूमिका घेतली. मराठा सरदारांमध्ये एकोपा निर्माण करून शाहू महाराजांची सत्ता मजबूत केली. त्यांच्या मुत्सद्देगिरीमुळे मराठ्यांना 'हिंदुस्थानातील एक महत्त्वाची शक्ति' म्हणून ओळख मिळाली. राजकीय डावपेच व मुत्सद्देगिरी यामुळे त्यांना **मराठा साम्राज्याचे चाणक्य** म्हटले जाते.

**2. बाजीराव प्रथम (1720–1740)**

- ✓ **पराक्रमी योद्धा** आणि **युद्धनीतीज्ञ.**
- ✓ उत्तर भारतात मोहिमा नेऊन मराठा साम्राज्याचा **विस्तार केला**. **1737 मध्ये दिल्लीवर छापा** टाकून मुघल साम्राज्याला हादरवले. 'हिंदुपदपादशाही' स्थापनेच्या ध्येयाने ते कार्यरत होते.
- ✓ **होळकर, शिंदे, भोसले, गायकवाड** यांना साम्राज्य विस्तारात जोडले. नागपूर, मालवा, बुंदेलखंडपर्यंत मराठ्यांचा अधिकार प्रस्थापित केला.
- ✓ निजामाविरुद्ध पळशी (1728) आणि भोपाळ (1738) येथील लढायांमध्ये विजय मिळवून दक्षिणेतील मराठा वर्चस्व प्रस्थापित केले.
- ✓ **"धैर्य शिकवता येत नाही, ते अंगी असावे लागते"** हे त्यांचे प्रसिद्ध धोरण. राजकीय मुत्सद्देगिरीपेक्षा रणांगणातील कौशल्यावर त्यांचा अधिक भर होता. ते आणि मस्तानी हा इतिहासातील एक चर्चेचा विषय ठरला.

**3. बाळाजी बाजीराव (नानासाहेब) (1740–1761)**

- ✓ साम्राज्याचा आणखी विस्तार केला. पुणे येथे **शनिवार वाडा** व इतर कामे करून प्रशासनिक पायाभूत सुविधा उभारल्या. **महसुलात सुधारणा** करून साम्राज्य आर्थिकदृष्ट्या बळकट केले.
- ✓ निजाम, मुघल व इतर प्रादेशिक सत्तांविरुद्ध मराठ्यांचे वर्चस्व टिकवले. रघुनाथराव, सदाशिवराव भाऊ यांच्यासारख्या सेनानींना साम्राज्यकार्यात पुढे आणले.
- ✓ पण 1761 मध्ये **पानिपतच्या तिसऱ्या युद्धात पराभव** झाला. या पराभवामुळे साम्राज्यावर दीर्घकालीन परिणाम झाले.

# पानिपत

## पार्श्वभूमी

- ➢ 1761 मध्ये मराठे व अहमदशहा अब्दाली यांच्यातील युद्धाला **पानिपतचे तिसरे युद्ध** म्हणतात.
- ➢ **अहमदशाह अब्दालीने** भारतावर आक्रमण करून लूट केली, त्यानंतर मराठ्यांनी त्याचा पराभव करण्यासाठी मोहीम आखली.
- ➢ मराठा सैन्याचे नेतृत्व नानासाहेब पेशवे यांचे पुत्र विश्वासराव आणि सदाशिवराव भाऊ यांनी केले होते.
- ➢ हे युद्ध 14 जानेवारी 1761 रोजी **हरियाणा राज्यातील पानिपत**जवळ झाले. युद्धात **मराठ्यांचा** मोठा पराभव **झाला.**
- ➢ **सदाशिवराव भाऊ व विश्वासराव** युद्धात मारले गेले.

## पराभवाची कारणे

1. **अहमदशहा अब्दालीचे बलाढ्य सैन्य** – संख्येने व शस्त्रसामग्रीने प्रबळ.
2. **मराठ्यांना स्थानिक राजांकडून मदत न मिळणे** – राजपूत, जाट, शिख यांनी तटस्थ भूमिका घेतली.
3. **पुरवठा व रसद व्यवस्थेतील कमतरता** – दीर्घ मोहिमेमुळे मराठ्यांचे अन्नधान्य व दारुगोळा संपला. मराठ्यांसोबत बराच नोकर आणि कौटुंबिक लवाजमा होता.
4. **नेतृत्वातील मतभेद** – होळकर, भोसले, शिंदे व इतर सरदारांमध्ये एकजूट नव्हती.
5. **भौगोलिक व हवामानाची अडचण** – उत्तर भारतातील थंडी, अनोळखी भूगोल.
6. **अहमदशहाच्या तंत्रांचा प्रभावी वापर** – वेढा, घोडदळाचे वेगवान हल्ले, विश्वासघात.
7. **शत्रूने स्थानिकांशी मैत्री करणे** – अब्दालीने रोहिला व इतर स्थानिक मुस्लीम सरदार जोडले.

## युद्धाचे परिणाम आणि राजकीय महत्व

- ➢ मोठ्या प्रमाणावर मराठा सरदार व सैनिक मारले गेले.
- ➢ पानिपतचा पराभव मराठ्यांसाठी **तात्पुरता धक्का** ठरला. मराठ्यांना पुन्हा संघटित होऊन **माधवराव प्रथमाच्या काळात पुनरुज्जीवन** करता आले.
- ➢ परंतू पानिपतचे परिणाम दीर्घकालीन ठरणारे होते. दिल्लीच्या उत्तरेकडील प्रदेशातील राजकीय संतुलन बदलले. या पराभवानंतर **दिल्लीवर मराठ्यांचा प्रभाव कमी** व्हायला सुरवात झाली. काही काळ **महादजी शिंदे** यांनी मराठ्यांचे सामर्थ्य पुन्हा उभारून दिल्ली दरबारावर प्रभाव टाकून मुघल सम्राटाचे संरक्षणकर्ते म्हणून ओळख मिळवली होती. परंतू ते अल्पकाळ टिकले.
- ➢ पानिपत युद्धाने भारतातील राजकीय घडामोडींमध्ये **ब्रिटिशांच्या उदयासाठी मार्ग मोकळा** केला.

Unleash the topper in you

# प्रशासन

## पार्श्वभूमी

- **अष्टप्रधान मंडळ:**
  - ✓ पंतप्रधान (पेशवा) : मंत्रिमंडळातील प्रथम क्रमांकाचे सर्वोच्च मंत्री. महाराजांच्या गैरहजेरीत राजाचा प्रतिनिधी या नात्याने राज्यकारभार पंतप्रधानालाच सांभाळावा लागत असे.
  - ✓ अमात्य (मजुमदार) : स्वराज्यातील सर्व महाल, परगण्यांचा एकूण जमाखर्च त्या त्या महाल, परगण्यातील अधिकाऱ्याकडून लिहून घेऊन तो तपासून बरोबर आहे की नाही हे पाहण्याचे त्याचे काम होते.
  - ✓ सचिव (सुरनीस) : सर्व जाणाऱ्या येणाऱ्या आज्ञापत्रे, पत्रव्यवहारावर लक्ष ठेवणे हे त्याचे काम होते.
  - ✓ मंत्री (वाकनीस) : यांच्याकडे महाराजांच्या खाजगी कारभाराकडे लक्ष ठेवण्याचे काम असे.
  - ✓ सेनापती (सरनौबत) : महाराजांच्या सैन्याचे घोडदळ व पायदळ हे दोन प्रमुख विभाग होते. या विभागांचा प्रमुख म्हणजे सेनापती.
  - ✓ सुमंत (डबीर) : हे स्वराज्याचे परराष्ट्र मंत्री होते. परराष्ट्रांना खलिते पाठविणे, परराष्ट्रांकडून आलेले खलिते घेणे, परराष्ट्रासंबंधात नियमितपणे महाराजांना माहिती आणि सल्ला देणे ही कामे आणि परराष्ट्रातून हेरांच्या साहाय्याने बातम्या काढण्याचे जबाबदारीचे काम त्यांना करावे लागे.
  - ✓ न्यायाधीश (काझी-उल-ऊझत) : हे स्वराज्याचे सरन्यायाधीश होते. दिवाणी व फौजदारी दोन्ही प्रकारच्या गुन्ह्यांबाबत खटले चालवून न्यायनिवाडा करून रयतेला न्याय देणे हे त्यांचे काम होते.
  - ✓ पंडितराव दानाध्यक्ष (सद्र-मुहतसिव) : हे धर्मखात्याचे प्रमुख होते. दानधर्म करणे, पंडित, विद्वान ब्राह्मणांचा सन्मान करणे, यज्ञ करणे, नियमित चालणाऱ्या धार्मिक कार्याबाबत सल्ला देणे, शास्त्रार्थ पाहणे ही यांची कामे असत.
- छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेली **अष्टप्रधान मंडळाची परंपरा** पुढे पेशव्यांच्या काळात बदलली. छत्रपती नाममात्र राहून **प्रत्यक्ष सत्ता पेशव्यांच्या हातात** आली.

## केंद्रीय प्रशासन

- **छत्रपती** : राज्याचे प्रतीक व औपचारिक अधिकारांचे केंद्र.
- **पेशवा** : प्रधान, प्रत्यक्ष सत्ताधीश, राज्यकारभाराचा प्रमुख.
- **केंद्रीय दफ्तर** : महसूल, परराष्ट्र धोरण, न्याय व लष्करी कामकाज यांसाठी स्वतंत्र विभाग.
- **अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती** इत्यादी पदे अस्तित्वात होती; मात्र त्यांची कार्यक्षमता कमी झाली.

## न्यायव्यवस्था

- **धार्मिक कायदे** व प्रथा यांनुसार न्यायनिवाडा केला जाई.
- गंभीर गुन्ह्यांवर शिक्षा ठरविण्याचा अधिकार **पेशव्यांकडे** होता.
- न्यायनिवाड्यात **पंडित, काजी, मौलवी** यांचा सल्ला घेतला जाई.
- गुन्ह्याच्या गंभीरतेनुसार **दंड, जप्ती, कैद किंवा मृत्युदंड** दिला जाई.

## पोलिस व्यवस्था

- **कोतवाल** – शहरांतील पोलिस व कायदा सुव्यवस्था पाहणारा अधिकारी.
- **फौजदार** – जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणारा.
- **गावकऱ्यांवर जबाबदारी** – गुन्हेगार पळाल्यास गावाला सामूहिक दंड.

## प्रांतीय व जिल्हा प्रशासन

- प्रांतांचे प्रशासन **सुभेदार** किंवा **सरदारांकडे** सोपवले जाई.
- तालुक्याचे प्रशासन **मामलतदार** बघत असे.
- महसूल संकलन, कायदा व सुव्यवस्था व कर वसुली ही मुख्य कामे होती.
- पेशव्यांनी केंद्र, प्रांतीय, जिल्हा व ग्रामपातळीवर प्रशासनाची पुनर्रचना केली.

## ग्राम प्रशासन

- गाव हा प्रशासनाचा सर्वात लहान घटक.
- **पाटील** – गावाचा प्रमुख, महसूल संकलन व सुव्यवस्था राखणे.
- **कुलकर्णी** – नोंदवही ठेवणारा, कर व जमिनीचे मोजमाप करणारा.
- **ग्रामसभा** – काही ठिकाणी स्थानिक प्रश्नांवर निर्णय घेत असे.

## नगर प्रशासन

- शहरातील सुव्यवस्था पाहण्यासाठी **कोतवाल** जबाबदार.
- बाजारपेठेचे नियंत्रण, दर ठरविणे, व्यापाऱ्यांवर देखरेख ही जबाबदारी होती.
- पाणीपुरवठा, स्वच्छता व सुरक्षेची काळजी घेतली जाई.

unleash the topper in you

## करव्यवस्था व उत्पन्नाची साधने

- **चौथाई व सरदेशमुखी** – मराठ्यांचे प्रमुख कर. चौथाई एकंदर एकचतुर्थांश व सरदेशमुखी ही पूर्ण उत्पन्नाच्या एकदशांश भाग एवढी असे. मराठा साम्राज्यात या दोन्ही वसूल्या मराठी राज्याबाहेर पण राज्याच्या छायेखाली असलेल्या प्रदेशांतून वसूल केल्या जात. चौथाई दौलतीकडे म्हणजे राज्याच्या खजिन्यात जमा होत असे तर सरदेशमुखीचा वसूल छत्रपतींच्या खाजगी उत्पन्नात जात असे. इ.स. 1719 मध्ये दिल्लीच्या बादशाहने आपल्या दक्षिणेतील सहा सुभ्यांवरील चौथाई व सरदेशमुखीच्या वसुलीचे अधिकार छत्रपती शाहूस दिले होते. इंग्रजांच्या आगमनानंतर व मराठा साम्राज्याच्या शेवटच्या काळात इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावकडून चौथाई व सरदेशमुखीचे सर्व हक्क इ.स. 1802 साली काढून घेतले.
- जमिनीवरील महसूल हा उत्पन्नाचा मुख्य स्रोत. व्यापाऱ्यांवर व बाजारांवर कर.
- युद्धातील लूट व जिंकलेल्या प्रदेशांवरील कर उत्पन्न.

## लष्करी व्यवस्था

- मराठ्यांची खरी ताकद म्हणजे **घोडदळ**. **सिल्हेदार व बर्गी** हे दोन प्रकारचे घोडदळ.
- पायदळ व तोफखाना तुलनेने कमकुवत.
- सरदारांच्या फौजा स्वतंत्र स्वरूपाच्या होत्या, पेशव्यांना त्यांच्यावर पूर्ण नियंत्रण ठेवणे कठीण जात असे.

## मूल्यांकन

- प्रशासन बहुधा **लष्कर व महसूल केंद्रित** होते.
- भ्रष्टाचार व शिस्तभंगाच्या घटना देखील आढळतात. तरीही गावपातळीवरचे प्रशासन तुलनेने **प्रभावी व स्थिर** होते.
- पेशवे सत्ताकेंद्र झाले, पण छत्रपतीचे प्रतीकात्मक स्थान कायम राहिले.

Toppersnotes
Unleash the topper in you

# 4 प्रकरण

# इंग्रजांचा कर्नाटकमधील प्रसार

## कर्नाटक युद्धे

### पार्श्वभूमी

- 18व्या शतकाच्या मध्यावर भारतात **इंग्रज व फ्रेंच** या युरोपियन सत्तांमध्ये प्राबल्याची स्पर्धा वाढली.
- दक्षिण भारतातील **कर्नाटक प्रदेश** (मद्रास, पाँडिचेरी, हैदराबाद) हा त्यांचा मुख्य संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला.
- ही युद्धे मूळतः युरोपमधील **ऑस्ट्रियन उत्तराधिकार युद्ध** व **सात वर्षांचे युद्ध** यांच्या परिणामस्वरूप झाली.
- भारतीय राजघराणी व नवाब यांचा वापर करून इंग्रज व फ्रेंच आपली सत्ता प्रस्थापित करू पाहत होते.

### प्रथम कर्नाटक युद्ध (1746–48)

- कारण : **ऑस्ट्रियन उत्तराधिकार युद्ध** (War of the Austrian Succession) (युरोप).
- घटना :
  - ✓ **फ्रेंचांनी मद्रास जिंकले** (1746).
  - ✓ **अँझे डुप्ले** व **ला बोरडोन्ने** हे फ्रेंच नेते प्रभावी ठरले.
  - ✓ शेवटी **ऐक्स-ला-शापेल तह (1748)** – मद्रास इंग्रजांना परत मिळाले. त्याबदल्यात फ्रेंचांना उत्तर अमेरिकेतील लुईसबर्ग मिळाले तसेच पॉण्डेचेरीवर आक्रमण न करण्याचे आश्वासन इंग्रजांनी फ्रेंचांना दिले.
- परिणाम : इंग्रज–फ्रेंच संघर्षाची सुरुवात भारतात दृश्यमान झाली.

### द्वितीय कर्नाटक युद्ध (1749–54)

- कारण : **हैदराबादचा व अर्काटच्या वारसापदाच्या** वादात इंग्रज व फ्रेंच हस्तक्षेप.
- घटना :
  - ✓ हैदराबाद 1748 मध्ये निजामाचा मृत्यू झाला व त्याचा दुसऱ्या क्रमांकाचा मुलगा नासिरजंग हा दुसरा निजाम म्हणून हैदराबादच्या गादीवर आला. पण त्याच्या गादीवर येण्याला निजामाच्या मुलीचा मुलगा **मुझफ्फरजंग याने विरोध** केला. अन्वरूद्दीन हा अर्काटचा नवाब होता. त्याच्या वारसाहक्कास माजी नवाब दोस्त अलीचा जावई **चंदासाहेब** याने विरोध केला. फ्रेंच **डुप्लेने मुझफ्फरजंग व चंदासाहेब** यांना पाठिंबा दिला. इंग्रजांनी **नासिरजंग व** अर्काटसाठी **मोहम्मद अली** यांना पाठिंबा दिला.
  - ✓ **अर्काटच्या वेढ्यात (1751) रॉबर्ट क्लाईव्ह**ने पराक्रम गाजवला. डुप्लेचे कर्नाटकात फ्रेंच साम्राज्य उभारण्याचे स्वप्न भंग पावले. डुप्लेला भारतातून माघारी बोलविण्यात आले. शेवटी पॉडिचेरीचा तह करण्यात आला.
- परिणाम : इंग्रजांची ताकद वाढली; फ्रेंचांचा प्रभाव घटला.

### तृतीय कर्नाटक युद्ध (1756–63)

- कारण : युरोपातील **सात वर्षांचे युद्ध (1756–63)** भारतातही पसरले.
- घटना :
  - ✓ इंग्रज व फ्रेंच यांच्यात दक्षिणेत निर्णायक संघर्ष.
  - ✓ **वांदीवाशची लढाई (1760)** – कर्नल आयर कूट यांच्या नेतृत्वाखाली इंग्रज विजयी.
  - ✓ **पाँडिचेरी (1761)** इंग्रजांच्या ताब्यात.
  - ✓ शेवटी **पॅरिस तह (1763)** – फ्रेंचांना भारतात व्यापाराची मुभा, पण राजकारणात हस्तक्षेप न करण्याची अट.
- परिणाम : भारतात **इंग्रजांचे वर्चस्व दृढ झाले**, फ्रेंचांचे वर्चस्व संपुष्टात आले.

### योगदान व परिणाम

- या युद्धांतून इंग्रजांची **राजकीय व लष्करी शक्ती** उघड झाली.
- फ्रेंचांचा प्रभाव केवळ व्यापारापुरता राहिला.
- भारतीय राजे व नवाब हे इंग्रज–फ्रेंचांच्या हातातील बाहुले ठरले.
- **भारतावर इंग्रज वर्चस्व स्थापनेची पायाभरणी** झाली.

### कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1746 | प्रथम कर्नाटक युद्ध सुरु– मद्रास फ्रेंचांनी घेतले |
| 1748 | ऐक्स-ला-शापेल तह – मद्रास इंग्रजांकडे परत |
| 1749 | दुसरे कर्नाटक युद्ध सुरु |
| 1751 | अर्काटचा वेढा – रॉबर्ट क्लाईव्ह विजयी |
| 1754 | पाँडिचेरीच्या तहाने युद्ध समाप्त |
| 1756 | तिसरे कर्नाटक युद्ध सुरु |
| 1760 | वांदीवाशची लढाई – इंग्रज विजय |
| 1763 | पॅरिस तह – फ्रेंचांचा प्रभाव संपुष्टात |

# इंग्रज-फ्रेंच स्पर्धा

## पार्श्वभूमी

- 18व्या शतकात भारतात **इंग्रज व फ्रेंच** यांच्यात व्यापार व राजकीय वर्चस्वासाठी संघर्ष उभा राहिला.
- दोघांनीही भारतीय राजे व नवाबांचा **सत्ता संघर्षात वापर** केला.
- प्रारंभी फ्रेंचांचा प्रभाव जास्त होता; पण शेवटी इंग्रज विजयी ठरले.

## फ्रेंचांच्या पराभवाची कारणे

1. **फ्रेंचांकडे समुद्री आरमाराची कमतरता**
   - ✓ इंग्रजांकडे बलाढ्य व आधुनिक नौदल होते.
   - ✓ इंग्रजांनी समुद्रमार्गांवर नियंत्रण मिळवले; फ्रेंच मदतीपासून वंचित राहिले.
2. **फ्रेंचांकडे स्थिर आर्थिक आधार नव्हता**
   - ✓ फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी तोट्यात होती.
   - ✓ इंग्रज कंपनीला ब्रिटिश संसदेचे आर्थिक व राजकीय पाठबळ होते.
3. **फ्रेंच नेत्यांची अस्थिर धोरणे**
   - ✓ **डुप्ले** हा कुशल होता; पण त्याला फ्रेंच सरकारकडून पुरेसा पाठिंबा मिळाला नाही.
   - ✓ इंग्रजांकडे मात्र **रॉबर्ट क्लाईव्ह, आयर कूट** यांसारखे स्थिर व निर्णायक नेते होते.
4. **फ्रेंचांना स्थानिक समर्थन कमी**
   - ✓ इंग्रजांनी नवाब व सरदारांशी दीर्घकालीन संधी व करार केले.
   - ✓ फ्रेंचांचे स्थानिकांशी संबंध कमकुवत होते.
5. **युरोपातील राजकीय परिस्थिती**
   - ✓ सात वर्षांच्या युद्धात (1756–63) फ्रान्सचा पराभव झाला.
   - ✓ त्यामुळे भारतात फ्रेंचांना कोणतेही मजबूत सैनिकी व राजकीय पाठबळ मिळाले नाही.
6. **इंग्रजांची संघटन व व्यापारी ताकद**
   - ✓ इंग्रजांनी मजबूत किल्ले, सुरक्षित व्यापारमार्ग व नियमित महसूल प्रणाली उभारली.
   - ✓ फ्रेंचांचे प्रयत्न तुटक व विसंगत राहिले.

Toppersnotes Unleash the topper in you

**5**
**प्रकरण**

# इंग्रजांचा बंगालमधील प्रसार

## प्लासी व बक्सार

### पार्श्वभूमी

- बंगाल हा 18व्या शतकात भारतातील सर्वांत **संपन्न प्रांत** होता.
- इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीने सुरतपासून सुरुवात करून बंगालमध्ये आपले **व्यापारकेंद्र** निर्माण केले.
- बंगालच्या **राजकीय अस्थिरतेचा** फायदा घेऊन इंग्रजांनी हळूहळू राजकीय हस्तक्षेप सुरू केला.

### अंधारकोठडीची घटना (Black Hole Tragedy – 1756)

- दक्षिणेतील तिसऱ्या कर्नाटक युद्धामुळे ब्रिटिशांनी बंगालमधील **कलकत्ता किल्ला (फोर्ट विल्यम किल्ला)** संरक्षित करायला सुरुवात केली होती.
- बंगालचा नबाब **सिराज-उद-दौला** इंग्रजांच्या वाढत्या प्रभावामुळे अस्वस्थ झाला. त्याने **कलकत्ता किल्ल्यावर (फोर्ट विल्यम)** हल्ला करून इंग्रजांना कैद केले. एका लहान तुरुंगात 146 इंग्रज कैद्यांना रात्रीभर ठेवले गेले; त्यात 123 जणांचा मृत्यू झाला.
- या घटनेने इंग्रजांना बदला घेण्यासाठी प्रवृत्त केले.

### प्लासीची लढाई (1757)

- प्लासीची लढाई **23 जून 1757** रोजी बंगालच्या प्लासी गावाजवळ लढली गेली. इंग्रज सेनापती **रॉबर्ट क्लाईव्ह** व बंगालचा नबाब **सिराज-उद-दौला** यांच्यात लढाई.
- **मीर जाफर, जगतशेठ व अमीरचंद** यांच्या विश्वासघातामुळे सिराज-उद-दौलाचा पराभव झाला.
- सिराज-उद-दौलाची हत्या करण्यात आली व **मीर जाफर** नबाब बनला.

### प्लासीच्या लढाईचे महत्त्व

- बंगालवर इंग्रजांचा पहिला निर्णायक विजय.
- भारतीय राज्यांत **फुटीरपणा व विश्वासघात** इंग्रजांच्या विजयाचे मुख्य कारण ठरले.
- इंग्रजांची **राजकीय सत्ता स्थापनेची पायाभरणी** झाली.

### मीर जाफर पदच्युत व मीर कासीमशी तह

- मीर जाफर इंग्रजांच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही.
- त्याला पदच्युत करून इंग्रजांनी **मीर कासीम** याला नबाब केले (1760).
- तहानुसार मीर कासीमने कंपनीला **मोठी आर्थिक मदत** दिली.

### शासक म्हणून मीर कासीम

- सुरुवातीला इंग्रजांना साथ दिली. परंतु इंग्रज अधिक लोभी होताच मीर कासीमने त्यांना विरोध केला.
- राजधानी **मुरशीदाबादहून मुंगेर** येथे हलवली. इंग्रजांविरुद्ध बंगाल, बिहार व अवधचे शासक एकत्र आणले.
- इंग्रज व मीर कासीम यांच्यात तणाव वाढला. **1764 मध्ये बक्सारची लढाई** झाली.

### बक्सारची लढाई (1764)

- बक्सारची लढाई 22 ऑक्टोबर 1764 रोजी ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी विरुद्ध बंगालचा नबाब **मीर कासीम**, अवधचा नबाब **शुजाउद्दौला**, व मुघल सम्राट **शाह आलम द्वितीय** यांच्या संयुक्त सैन्यात झाली.
- ही लढाई हेक्टर मनरो यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटीशांनी जिंकली आणि या विजयामुळे बंगालवर कंपनीचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित झाले, ज्यामुळे भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या विस्ताराचा पाया घातला गेला.

### बक्सारच्या लढाईचे महत्त्व

- प्लासीप्रमाणे केवळ विश्वासघात नव्हता, तर ही खरी **लष्करी विजयाची लढाई** होती.
- या विजयामुळे इंग्रजांना **बंगाल, बिहार व उडीसा या प्रांतांवरील दीवाणी हक्क** (1765 चा अलाहाबाद तह) मिळाले.
- इंग्रज आता केवळ व्यापारी न राहता **भारतातील राजकीय सत्ताधीश** बनण्यास पात्र ठरले.

## कालरेषा

| वर्ष | घटना |
|---|---|
| 1756 | अंधारकोठडीची घटना |
| 1757 | प्लासीची लढाई – इंग्रजांचा विजय |
| 1760 | मीर कासीम नबाब झाला |
| 1764 | बक्सारची लढाई – इंग्रजांचा विजय |
| 1765 | अलाहाबाद तह – दीवाणी हक्क इंग्रजांना |

# डूप्ले

## पार्श्वभूमी

- **जोसेफ फ्राँस्वा डुप्ले (Joseph François Dupleix)** हा फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा प्रमुख अधिकारी होता.
- 1742 मध्ये तो **फ्रेंचांचा भारतातील गव्हर्नर** झाला.
- दक्षिण भारतात इंग्रज–फ्रेंच संघर्षाच्या काळात त्याने **फ्रेंच सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न** केला.
- त्याच्या काळात कर्नाटक युद्धे झाली, ज्यात सुरुवातीला फ्रेंचांना यश मिळाले.

## प्रशासक म्हणून डुप्ले

- **पाँडिचेरी** हे मुख्यालय मजबूत केले.
- कर, महसूल, व्यापार व्यवस्थापन यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याचे प्रयत्न केले.
- फ्रेंच सत्तेचे **प्रशासकीय व आर्थिक पायाभूत काम** केले.

## कूटनीतिज्ञ म्हणून डुप्ले

- भारतीय राजकारणातील संघर्षांचा **चलाखीने फायदा** घेतला.
- हैदराबाद व कर्नाटक येथील उत्तराधिकाराच्या वादात फ्रेंचांचा हस्तक्षेप घडवून आणला.
- चंदासाहेब व मुज्जफर जंग यांना पाठिंबा देऊन **फ्रेंचांचा प्रभाव वाढवला**.
- इंग्रजांच्या तुलनेत अधिक **स्थानिक राजे आपल्या बाजूला वळवले**.

## नेता म्हणून डुप्ले

- सुरुवातीला **प्रथम व द्वितीय कर्नाटक युद्धांत फ्रेंचांचा विजय** झाला.
- इंग्रजांना आव्हान देऊन फ्रेंच साम्राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न.
- परंतु इंग्रजांचे मजबूत **नौदल, आर्थिक साधनसंपत्ती व सातत्यपूर्ण पाठबळ** यांसमोर त्याचे प्रयत्न अपुरे ठरले.

## डुप्लेचे परतणे

- फ्रेंच सरकारने त्याला पुरेसा पाठिंबा दिला नाही.
- इंग्रजांशी स्पर्धा करताना कंपनीची आर्थिक स्थिती बिघडली.
- 1754 मध्ये डुप्ले मायदेशी परतला. त्याचे स्वप्न पूर्ण होण्याआधीच **फ्रेंच सत्ता क्षीण** झाली.

## डुप्लेचे राजकीय विचार व इतिहासातील स्थान

- भारतात फ्रेंचांचे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचा **पहिला प्रयत्न** डुप्लेने केला.
- स्थानिक शासकांना आपल्या बाजूला करून इंग्रजांविरुद्ध संघर्ष उभा केला.
- पण **नौदलशक्तीचा अभाव, आर्थिक पाठबळाची कमतरता** यामुळे तो अपयशी ठरला.
- भारतीय इतिहासात डुप्ले हा **"फ्रेंच स्वप्नांचा शिल्पकार"** मानला जातो.

# क्लाईव्ह

## पार्श्वभूमी

- **रॉबर्ट क्लाईव्ह** हा इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीचा सेनानी व प्रशासक होता.
- प्लासी (1757) आणि बक्सार (1764) या विजयांनंतर इंग्रजांचा बंगालवर प्रभाव प्रस्थापित झाला.
- 1765 मध्ये क्लाईव्ह पुन्हा भारतात आला आणि **बंगालचा गव्हर्नर** झाला. बंगालचा प्रथम व दोन वेळा गव्हर्नर.
- त्याच्या काळात बंगालात **दुहेरी शासनपद्धती** सुरू करण्यात आली.

## संक्षिप्त जीवनचरित्र

- जन्म: 1725, इंग्लंडमध्ये.
- सुरुवातीला ईस्ट इंडिया कंपनीत **लेखनिक** म्हणून नोकरी.
- पुढे सैन्यात दाखल होऊन अनेक लढायांत इंग्रजांना विजय मिळवून दिला.
- 1757 प्लासी विजयाचा **शिल्पकार** म्हणून ख्याती.
- 1765–67 या काळात बंगालचा दुसरा गव्हर्नर.

## राजकीय व्यवस्था

- अलाहाबाद तह (1765) नुसार इंग्रजांना **बंगाल, बिहार व उडीसा** यांचे **दीवाणी हक्क** मिळाले.
- कंपनीला महसूल वसुलीचा अधिकार मिळाला.
- पण प्रशासनिक जबाबदारी नबाबाकडेच ठेवण्यात आली.

Toppers Notes Unleash the topper in you

## दुहेरी शासनपद्धती (Dual Government, 1765–72)

- महसूल संकलन : **इंग्रज कंपनी**कडे.
- न्याय व प्रशासन : **नबाबाकडे**.
- प्रत्यक्ष सत्ता इंग्रजांची, पण जबाबदारी नबाबाची – ही विसंगती.

## क्लाईव्हचे दुहेरी शासनाबाबत समर्थन

- इंग्रजांना महसूल वसुलीचे सर्व फायदे मिळाले.
- नबाबाकडे जबाबदारी असल्याने इंग्रजांना खर्च व प्रशासनाची जबाबदारी टाळता आली.
- कंपनीसाठी हा आर्थिक दृष्ट्या **सुवर्णकाळ** ठरला.

## दुहेरी शासनपद्धतीचे दोष

- जबाबदारी व सत्ता यांत विसंगती.
- महसूल वसुली कठोर पद्धतीने झाली; शेतकरी व कारागीर यांचे हाल.
- प्रशासनिक निष्काळजीपणामुळे **दुष्काळ (1770)** भयावह ठरला; लाखो लोक मृत्यूमुखी.
- बंगालची समृद्धी नष्ट झाली.

## प्रशासकीय सुधारणा

- कंपनीतील **लाचलुचपत, भ्रष्टाचार** थांबवण्यासाठी पावले उचलली.
- "क्लाईव्ह कोड" नावाने कंपनी अधिकाऱ्यांसाठी काही नियम केले.
- कंपनीच्या **लष्कराची पुनर्रचना** केली.

## क्लाईव्हचे मूल्यमापन व विद्वानांचे विचार

- इंग्रजांच्या भारतातील राजकीय पायाभरणीचा **मुख्य शिल्पकार**.
- पण त्याची धोरणे बंगालच्या जनतेसाठी **अत्यंत घातक** ठरली.
- इतिहासकार सर जॉन सीली म्हणतो – “Clive was not only the maker of the English empire in India but also the destroyer of Bengal’s prosperity.”

# वॉरेन हेस्टिंग्ज

## पार्श्वभूमी

- **वॉरेन हेस्टिंग्ज** हा ईस्ट इंडिया कंपनीचा पहिला गव्हर्नर-जनरल मानला जातो.
- क्लाईव्हच्या दुहेरी शासनपद्धतीनंतर बंगालची स्थिती बिकट झाली होती.
- 1770 च्या भीषण दुष्काळामुळे **लाखो लोक मृत्यूमुखी** पडले.
- या पार्श्वभूमीवर कंपनीला स्थिर प्रशासन व महसूल सुधारणा आवश्यक होती.
- 1772 मध्ये हेस्टिंग्जला बंगालचा गव्हर्नर नेमण्यात आले; 1773 च्या नियंत्रणाच्या कायद्याने 1774 मध्ये तो **पहिला गव्हर्नर-जनरल** ठरला.

## संक्षिप्त जीवनचरित्र

- जन्म: 1732, इंग्लंडमध्ये.
- सुरुवातीला कंपनीच्या लहानशा पदावरून सुरुवात.
- बंगालमध्ये क्लाईव्हनंतर त्याने प्रशासनाची जबाबदारी घेतली.
- कार्यकाळ: 1772–1785.

## वॉरेन हेस्टिंग्जच्या सुधारणा

1. **प्रशासकीय सुधारणा**
   - ✓ दुहेरी शासनपद्धती संपुष्टात आणली. महसूल व न्यायकारभार कंपनीच्या हातात घेतला.
   - ✓ **कलेक्टर** या पदाची निर्मिती – जिल्ह्यांचा महसूल व कायदा पाहण्याची जबाबदारी.
2. **भूमीकर सुधारणा**
   - ✓ महसूल वसुली थेट शेतकऱ्यांकडून न घेता **जमीनदारांमार्फत** घेतली.
   - ✓ यामुळे महसूल नियमित मिळू लागला; पण शेतकऱ्यांचे शोषण वाढले.
3. **न्यायालयीन सुधारणा**
   - ✓ जिल्हास्तरावर **दिवाणी व फौजदारी न्यायालये** सुरू केली. कलकत्त्यात **सदर न्यायालय** स्थापन.
   - ✓ हिंदूसाठी मनुस्मृती व मुसलमानांसाठी कुराण यांच्या आधारे कायदे.
4. **आर्थिक सुधारणा**
   - ✓ खर्च नियंत्रणासाठी पावले. महसूल संकलनाची काटेकोर व्यवस्था.
   - ✓ कंपनीच्या अधिकाऱ्यांवर **भ्रष्टाचारविरोधी नियम** लागू.

## नियमनाचा कायदा (Regulating Act) – 1773

- ब्रिटिश संसदेने कंपनीच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा केला.
- बंगालचा गव्हर्नर हा **भारताचा गव्हर्नर-जनरल** ठरला.
- गव्हर्नर-जनरलला मदत करण्यासाठी **कौंसिल** स्थापन.
- इंग्रज संसदेचा भारतातील व्यवहारांवर थेट हस्तक्षेप सुरू झाला.
- भारतात 1774 पासून सर्वोच्च न्यायालय सुरू झाले

ToppersNotes Unleash the topper in you